# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:19.08.2026** **वार:बुधवार**

---

1. राष्ट्रीय परिक्षा परिषदेकडून परीक्षा-विषयक गटामध्ये फेरबदल, 600 तज्ज्ञ कार्यमुक्त,
2. झारखंडमध्ये रद्द करण्यात आलेल्या 44 भरती परीक्षांची यादी जाहीर,
3. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तमिळनाडूच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर,
4. भारतीय निवडणूक यंत्रणेच्या विश्वासार्हतेचं अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांकडून कौतुक, आणि
5. ऋषभ पंतचा शतकी षटकार, गॉल कसोटी क्रिकेटमध्ये ऐतिहासिक कामगिरी.

**NTA**

राष्ट्रीय परिक्षा परिषद अर्थात एनटीएनं 600 तज्ज्ञांना कार्यमुक्त करून आणि नवीन तज्ज्ञांची नियुक्ती करत आपल्या परीक्षाविषयक गटामध्ये फेरबदल केले आहेत, अशी माहिती शिक्षण मंत्रालयाने समाजमाध्यमावरील संदेशात दिली आहे. परीक्षांच्या उत्तरपत्रिकांची छाननी प्रक्रिया अधिक बळकट करण्यासाठी NTA द्वारे चार-स्तरीय तपासणी प्रणाली लागू केली जाईल. तसंच, NTA पुढील दोन ते तीन आठवड्यांत किमान 25 अधिकाऱ्यांची नव्याने नियुक्ती करणार आहे. याव्यतिरिक्त, NTA ची कार्यालये नवीन जागेत हलवली जातील आणि केंद्रिय सुरक्षा दलाच्या तुकड्यांच्या मदतीने सुरक्षा व्यवस्था अधिक कडक केली जाईल. आगामी काळातील परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आवश्यक ती सर्व सुरक्षा आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय केंद्रीय शिक्षण मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या निर्देशानुसार NTA ने घेतला आहे.

**झारखंड-आंदोलन**

झारखंडमधील विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर झारखंड सरकारने अनियमिततेमुळे रद्द करण्यात आलेल्या 44 भरती परीक्षांची यादी काल जाहीर केली. यासंदर्भात अधिसूचना जारी करण्यात आली आहे. रद्द करण्यात आलेल्या परीक्षांमध्ये 2014 पासून झारखंड लोकसेवा आयोग आणि 'टीएसआर डेटा प्रोसेसिंग प्रा. लि.'या बाह्य संस्थेद्वारे घेण्यात आलेल्या परीक्षांचा समावेश आहे. रद्द करण्यात आलेल्या परीक्षांमध्ये औषध निरीक्षक, सहाय्यक प्राध्यापक, उपजिल्हाधिकारी, दंतवैद्य, सहाय्यक अभियंता आदींच्या भरतीसाठीच्या परीक्षांचा समावेश आहे.

JPSC आणि JSSC मधील अनियमिततेशी संबंधित प्रकरणांच्या सुनावणीसाठी जलदगती न्यायालय स्थापन करण्याची विनंती उच्च न्यायालयाकडे केली जाईल. वरिष्ठ जिल्हाधिकारी अमिताभ कौशल यांच्या अध्यक्षतेखाली JPSC आणि JSSC मधील सुधारणांसाठी स्थापन करण्यात आलेली समिती दोन महिन्यांत सरकारला आपला अहवाल सादर करेल. सोमवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर राज्य सरकारने 'JSSC-CGL परीक्षा' रद्द करण्याची घोषणा केली होती.

**दिल्ली आंदोलन-चौकशी**

नीट पेपरफुटी प्रकरणी नवी दिल्लीत आंदोलन करणाऱ्यांवर झालेल्या पोलीस कारवाईच्या चौकशीसाठी सर्वोच्च न्यायालयानं उच्च स्तरीय समिती नियुक्त केली आहे. ही समिती महिला आंदोलकांवर झालेल्या कारवाईचीही तसंच पोलीस कर्मचाऱ्यांवरील झालेल्या हल्ल्याची चौकशी करेल. या समितीत सेवानिवृत्त न्यायाधीश, माजी पोलीस महासंचालक आणि सीबीआयच्या माजी संचालकांसह इतरांचा समावेश असणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि व्ही. मोहन्ना यांच्या खंडपीठानं काल हे आदेश दिले.

**अमित-शाह-दौरा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तमिळनाडूच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आज चेन्नईला पोहोचतील. ते उद्या चेन्नईजवळील कोवलम इथं होणाऱ्या दक्षिणेकडील राज्यातील मुख्यमंत्र्यांच्या परिषदेला उपस्थित राहतील. या परिषदेला तमिळनाडू, केरळ, आंध्रप्रदेश, तेलंगण आणि पुद्दुचेरीचे मुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत.

**PNG- योजना**

देशभरातील घरांपर्यंत स्वयंपाकासाठी स्वच्छ, सुरक्षित आणि परवडणारा पाईपद्वारे पुरवला जाणारा गॅस पोहोचवण्याच्या उद्देशाने, सरकारने 'घरगुती PNG जोडण्यांना प्रोत्साहन देणारी योजना' मंजूर केली आहे. ही योजना पुढील महिन्याच्या 1 तारखेपासून लागू होईल. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने यासंदर्भात माहिती दिली आहे. सध्या देशभरात 1 कोटी 74 लाख घरगुती PNG जोडणी देण्यात आली आहे. ही योजना सहा महिन्यांच्या कालावधीत दोन टप्प्यांमध्ये राबवली जाईल.

**ब्रिक्स**

भारताच्या अध्यक्षेखाली सुरु असलेल्या परिषदेत ब्रिक्स राष्ट्रांनी पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासावरील सहकार्य अधिक दृढ करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा काल पुनरुच्चार केला. नवी दिल्ली इथं झालेल्या 12व्या ब्रिक्स पर्यावरण मंत्र्यांच्या बैठकीनंतर संयुक्त निवेदन जारी करण्यात आलं. ब्रिक्स राष्ट्रांनी शाश्वत विकासासाठी 2030 पर्यंत, पॅरिस कराराची पूर्ण आणि प्रभावी अंमलबजावणी करण्यासंदर्भात वचनबद्ध असून हवामान बदलावरील संयुक्त राष्ट्रानं दिलेली कार्यपध्दती लागू केली जाईल, असं पुन्हा अधोरेखित केलं.

ब्रिक्स आयसीटी कार्यगटाच्या पुण्यात सुरू असलेल्या 7व्या बैठकीच्या दुसऱ्या दिवशी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांसंबंधित गट आणि डिजिटल ब्रिक्स कार्यदलाची प्रत्यक्ष बैठक काल पार पडली.

**ट्रंप-निवडणूक यंत्रणा**

भारताच्या निवडणूक यंत्रणेची विश्वासार्हता आणि सक्षमतेनं जागतिक स्तरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे, असे गौरवोद्गार परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल नवी दिल्ली इथं प्रसारमाध्यमांशी बोलताना काढले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताच्या निवडणूक प्रणालीचे केलेले कौतुक आणि अमेरिकेतील निवडणुकांमध्ये मतदारांच्या ओळखपत्राबाबत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी केलेल्या टिप्पणीचा त्यांनी केलेला उल्लेख, या संदर्भात जयस्वाल बोलत होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी ट्रुथ या समाजमाध्यमावरील संदेशांत भारताच्या निवडणूक प्रक्रियेसंदर्भात काल संदेश पोस्ट केला आहे.

**अमेरिका-इराण**

अमेरिका-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेसोबत स्वाक्षरी केलेल्या 14 -कलमी सामंजस्य करारांतर्गत इराणच्या सर्व अटींची पूर्तता होईपर्यंत होर्मुझची सामुद्रधुनी सागरी वाहतुकीसाठी बंद राहील, असं इराणनं काल जाहीर केलं. दरम्यान, अमेरिकेची इराणसोबत चर्चेची कोणतीही योजना नसल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल' या समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता चर्चेसाठी लष्करी संघर्ष थांबवण्याकरिता सामंजस्य कराराद्वारे देण्यात आलेली 60 दिवसांची मुदत संपत असतानाच दोनही देशांकडून ही विधाने करण्यात आली आहेत.

**अटक**

दिल्ली राज्य सरकारच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं दिल्ली जल मंडळाच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांच्या विस्तारीकरण संदर्भातील निविदा प्रक्रियेत अनियमितता असल्याचा आरोप आहे. या पार्श्वभूमीवर माजी मंत्री आणि आम आदमी पक्षाचे नेते सत्येंद्र कुमार जैन यांच्यासह मंडळाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी उदित प्रकाश राय आणि इतर चार आरोपींना

अटक केली आहे. निविदा प्रक्रियेमध्ये तांत्रिक फेरफार करण्यात आला होता आणि याद्वारे काही निवडक खाजगी संस्थेला फायदा मिळवून देण्यात आला, असं तपासात आढळून आलं आहे.

**इस्रायल-सीरिया**

इस्रायलनं सीरियाच्या अबू दुहुर हवाई तळावर काल हवाई हल्ले केले. या तळावर तुर्की सैन्याच्या तैनातीला रोखणं हा या कारवाईचा उद्देश असल्याचं इस्रायलनं म्हटलं आहे. सीरियाने इस्रायलच्या या कारवाईचा निषेध केला आहे. परराष्ट्र मंत्री असद अल-शिबानी यांनी या हल्ल्यांना सीरियाच्या सार्वभौमत्वाचं उल्लंघन असल्याचं म्हटलं आहे. तुर्कीनंही इस्रायलच्या या हल्ल्यांचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे.

**युएई-इराण**

संयुक्त अरब अमिरातीनं इराणसोबतचे सर्व व्यापार, व्यावसायिक देवाणघेवाण आणि आर्थिक व्यवहार पुढील आदेशापर्यंत स्थगित केले आहेत. आंतरराष्ट्रीय कायदा आणि जागतिक मानकांनुसार प्रादेशिक स्थिरता राखणं आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक प्रणालीची अखंडता अबाधित ठेवणं हा या निर्णयाचा उद्देश असल्याचं संयुक्त अरब अमिरातीच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या संचार संचालिका अफ्रा अल हामेली यांनी सांगितलं.

**क्रीडा पुरस्कार**

केंद्रीय युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयानं काल 2025 साठीच्या राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांची घोषणा केली. यामध्ये राज्यानं उल्लेखनीय यश संपादन केलं आहे. बुद्धिबळपटू ग्रँडमास्टर विदित गुजराती आणि ग्रँडमास्टर दिव्या देशमुख यांना अर्जुन पुरस्कार, नेमबाजी प्रशिक्षक नेहा चव्हाण यांना द्रोणाचार्य पुरस्कार, तर पुण्यातील आर्मी पॅरालिम्पिक नोड यांना राष्ट्रीय क्रीडा प्रोत्साहन पुरस्कार जाहीर झाला आहे. एकंदर 17 खेळाडूंना अर्जुन पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत

**क्रिकेट**

श्रीलंकेत गॉल इथं सुरु असलेल्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या चौथ्या दिवसअखेर काल यजमान संघाची धावसंख्या 4 बाद 84 वर होती. विजयासाठी श्रीलंकेला आणखी 288 धावांची गरज आहे. भारताचा दुसरा डाव काल 193 धावात आटोपला. मात्र पहिल्या डावातील 178 धावांच्या आघाडीमुळे श्रीलंकेपुढं विजयासाठी 372 धावांचं आव्हान ठेवता आलं. ऋषभ पंतनं 69 चेंडूंत 66 धावांची वेगवान खेळी करत सर्वाधिक धावा केल्या. या खेळीदरम्यान कसोटी क्रिकेटमध्ये 100 षटकार पूर्ण करणारा तो पहिला भारतीय फलंदाज ठरला.

**हवामान**

हिमाचल प्रदेशात मुसळधार पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे.सिरमौर जिल्ह्यातील काफोटो जवळील खाणकाम क्षेत्रात काल दरड कोसळल्यानं तीन मजुरांचा मृत्यू झाला.घटनास्थळी मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. तसंच सोलन जिल्ह्यात कोटी भागात दरड कोसळल्यानं शिमला-कालका मार्गावरची रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली आहे.

दरम्यान, हवामान विभागानं आज पूर्व आणि पश्चिम उत्तर प्रदेश, पूर्व मध्य प्रदेश आणि उत्तराखंडमधल्या काही ठिकाणी अतिवृष्टीचा अंदाज वर्तवला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं,**

**नमस्कार.**